DIRECTORATE OF PROSECUTION,
MAHARASHTRA STATE, MUMBAI.
अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
बॅरेक्स क्र. ६, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मनोरा आमदार निवास जवळ, मुंबई-४०००२१.
☎ २२०२ ८२९३, फॅक्स २२८८ ६६७२ E-mail:- DPP_Maharashtra @ maharashtra.gov.in

# -: नागरिकांची सनद :-

| | | |
|---|---|---|
| शासकीय कार्यालयाचे नांव व पत्ता | : | **अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई** बॅरेक्स क्र. ६, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मनोरा आमदार निवास जवळ, मुंबई-४०००२१. |
| शासकीय व्यवस्थेतील खात्याचे स्थान | : | गृह विभागांतर्गत अभियोग यंत्रणेचे व्यवस्थापन व नियंत्रण. |
| कार्यालयातर्फे पुरविण्यात येणा-या सेवा | : | अभियोग यंत्रणेचे व्यवस्थापन व नियंत्रण. |
| कोणत्या कायद्यानुसार/ नियमानुसार / शासन निर्णयानुसार | : | शासन निर्णय गृह विभाग क्र.एसपीपी-१०९५/प्र.क्र.१४९/ पोल-१०, दि.२०/५/१९९७. |
| कार्यालयाच्या सेवा कोणाला दिल्या जातात. | : | फौजदारी न्यायालयातील फौजदारी खटल्याचे कामकाज अभियोग पक्षाच्या वतीने चालविणे. |
| या सेवा कोण देते व कशा प्रकारे | : | संचालनालयांतर्गत कार्यरत सरकारी अभियोक्ते आणि अतिरिक्त सरकारी अभियोक्ते हे सत्र न्यायालयीन प्रकरणे चालवितात आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महानगर दंडाधिकारी यांच्या न्यायालयात प्रकरणे चालवितात. |
| या सेवा दिल्या गेल्या नाहीत तर दाद कोणाकडे मागावयाची | : | अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| तक्रार करण्यासाठी कोणती बंधने असतील | : | तक्रार करण्यासाठी कोणतीही बंधने नाहीत. |
| सेवा पुरविण्याच्या कार्यपध्दतीचे मुल्यांकन | : | अभियोक्त्याच्या कार्यपध्दतीचे मुल्यांकन करण्यासाठी निकटतम वरिष्ठ अधिकारी म्हणून सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता जिल्हा पातळीवर कार्यरत आहेत. त्यानंतर परिक्षेत्रीय स्तरावर उपसंचालक कार्यरत आहेत. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे विभाग प्रमुख असून, अंतिम मुल्यांकन त्यांच्या स्तरावर होते. |

| | | |
|---|---|---|
| नागरिकांच्या संचालनालयाकडून काय अपेक्षा आहेत | : | न्यायदान प्रक्रियेत सहकार्य करुन योग्य ते न्यायनिर्णय होण्यास मदत करणे. |
| संचालनालयातील कार्यरत अधिकारी व त्यांची श्रेणी | : | **संचालक**<br>**सहाय्यक संचालक (प्रशासन)**<br>**अतिरिक्त सरकारी अभियोक्ता**<br>**सहाय्यक सरकारी अभियोक्ता**<br>**प्रशासकीय अधिकारी / लेखा अधिकारी**<br>**अधीक्षक** |

**तक्रारींचे निवारण :-**

| | | |
|---|---|---|
| तक्रार निवारणासाठी संपर्क अधिकारी | : | अभियोक्त्याच्या कामकाजाबाबत अथवा कार्यपध्दतीबाबत तक्रार असल्यास खालील अधिका-यांशी संपर्क साधावा :-<br>अ) जिल्हा पातळीवर :- सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता.<br>ब) परिक्षेत्र पातळीवर :- उपसंचालक परिक्षेत्रीय कार्यालय, परिक्षेत्र.<br>क) मुख्यालय पातळीवर :- संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |

नागरिकांची सनद उपलब्ध करण्यात आली असून, नागरिकांचे याबाबत काही मत अथवा टिप्पणी असल्यास ते उपरोक्त नमूद पत्त्यावर कळविण्यात यावे. नागरिकांच्या सूचना स्वागतार्ह आहेत.

**``सनदेत दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी वचन देणारे संचालनालय आणि ज्यांना वचन दिले आहे त्यांच्याशी बांधील आहे``**

***स्वाक्षरी/-***
**संचालक,**
**अभियोग संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**